**विकास योजनेमध्ये न्यायिक संस्थेसाठी जागा आरक्षित ठेवणेबाबत.**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१७/११४७/प्र.क्र.११९/१७/नवि-१३**
**दिनांक :०७ ऑगस्ट, २०१७.**

राज्यातील नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार विकास योजना तयार करणे तसेच त्या वेळोवेळी उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार सुधारीत करणे बंधनकारक आहे. अशा विकास योजना तयार करतेवेळी / सुधारीत करतेवेळी त्यामध्ये शासकीय विभागाकरीता त्यांचे मागणीनुसार आवश्यक प्रयोजनाकरीता आरक्षणे दर्शविण्याची कार्यपध्दती आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१५६/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०५/०५/२०१७ रोजी आदेश पारित केलेले असून त्याद्वारे राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना विकास योजनेमध्ये न्यायीक संस्थेसाठी आरक्षण ठेवणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१५४ अन्वये निदेश देण्याचे सूचित केलेले आहे. सबब, यास अनुसरुन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ प्रमाणे पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी विकास योजना तयार करतांना अथवा सुधारीत करतांना त्या जिल्ह्यातील न्यायीक संस्थेच्या सल्याने / आवश्यकतेप्रमाणे संबंधित विकास योजनेत न्यायिक संस्थांसाठी आरक्षणे दर्शविण्याबाबतची कार्यवाही प्राधान्याने करावी. अशी आरक्षणे शक्यतो शासकिय जागेवर प्रस्तावित करावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
१) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
२) मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगर पंचायत.

प्रत माहितीसाठी:-
१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा.राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव.

३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करावेत तसेच त्याच्या प्रती राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना /विशेष नियोजन प्राधिकरणांना पाठवून देण्यात याव्यात.

६) व्यवस्थापकीय संचालक ,सिडको ,निर्मल बिल्डींग ,मुंबई.
७) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
८) संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सह संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष / मुल्यांकन / पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग
११) विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग.
१२) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
१३) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, सर्व शाखा कार्यालये, नगर रचना विभाग.
१४) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१५) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१६) अवर सचिव, नवि-११ / नवि-१३ / नवि-३०.
१७) कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि-१२.
१८) निवडनस्ती (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32
सत्यमेव जयते